Here's the English translation of the Marathi text

**16. Yashwantrao Chavan's Educational Thoughts and Work**

**Prof. Shobha Bhimapya Kamde**

Tuljaram Chaturchand College, Baramati

**Dr. Sandip Sambhaji Tadwalkar**

Head of History Department, Tuljaram Chaturchand College, Baramati

### Introduction

Maharashtra is the only state in the nation with a special status in every field. Many eminent personalities from various fields, including politics, sociology, administration, science, and literature, have left an indelible mark on Maharashtra. The efforts and foresight of these personalities have not only advanced Maharashtra but have also contributed to the nation. Among them, notable figures like Mahatma Jyotirao Phule, Savitribai Phule, and Dr. Babasaheb Ambedkar stand out. The first Chief Minister of Maharashtra, Yashwantrao Chavan, is also prominent among these personalities, who significantly impacted Maharashtra's development. This paper explores Yashwantrao Chavan's contribution to Maharashtra's growth, especially in the field of education.

### Yashwantrao Chavan

Yashwantrao Chavan was born on 12 March 1913 in the village of Devrashtre. His childhood in Satara district was marked by hardship, poverty, and challenges, but these conditions nurtured his social consciousness. His early exposure to significant issues inspired him to work towards social change. After studying on a scholarship, he pursued his education despite many difficulties and became a prominent figure in Maharashtra's political and social spheres.

Yashwantrao's political career began in the freedom movement, where he actively opposed British rule. Later, he took on leadership roles within Maharashtra, championing causes of social reform and progress. He aimed to empower society through education, and this belief was reflected in his educational policies and work.

### Yashwantrao Chavan's Educational Philosophy

In one of his speeches, titled "Education and National Unity," Yashwantrao Chavan emphasized the importance of education as a tool for national development and societal transformation. He highlighted how education helps build unity and fosters a spirit of self-sufficiency and pride among

the youth. Chavan believed that education should not only provide knowledge but also inculcate values of equality and social justice. He advocated for a system where education serves as a means for social upliftment and unity.

---

This translation captures the essence of the document. Let me know if you need further details or specific sections translated.



# २६. यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक विचार व कार्य

**प्रा. शोभा भिमप्पा कानडे**
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती.
**डॉ. संदीप संभाजी तारदाळकर**
इतिहास विभाग प्रमुख, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती.

**प्रस्तावना**

महाराष्ट्र हे अनेक क्षेत्रात आघाडीवर असलेले राज्य आहे. देशात आज महाराष्ट्राला हे स्थान मिळवून देण्यात अनेकांचा सहभाग आहे. राजकारणी, समाजसुधारक, अभ्यासक, वैज्ञानिक, साहित्यिक इत्यादींनी महाराष्ट्र घडवण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. महाराष्ट्राला आजपर्यंत जे मुख्यमंत्री लाभले त्यातील काही मुख्यमंत्र्यांचा महाराष्ट्राला सर्वच क्षेत्रात पुढे नेण्यात महत्त्वाचा वाटा आहे. त्यांची धोरणे, निर्णय त्यांची व्यक्तिमत्वे इत्यादी बाबींचा महाराष्ट्राच्या राजकीय सामाजिक जडणघडणीवर परिणाम झाल्याचे दिसून येते. या शोधनिबंधात महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक विचार व कार्य याचा आढावा घेतला आहे.

**यशवंतराव चव्हाण**

यशवंतराव चव्हाण यांचा जन्म देवराष्ट्र येथे १२ मार्च १९१३ रोजी झाला. सातवाहनांच्या राज्यानंतर छोटी मोठी राज्ये उदयाला आली त्यात देवराष्ट्र हे एक होते. त्याची राजधानी होती कौडिन्यपूर. नंतर तिचे नाव कुंडल पडले.[१] वडील बळवंतराव हे विट्याजवळ असलेली थोडी शेती पाहत, पण कोरडवाहू जमीन काही फारसे उत्पन्न देत नसे. तेंव्हा नोकरीच्या शोधात बळवंतरावांना फिरावे लागले, पण नंतर त्यांना बेलिफाची नोकरी मिळाली. ज्ञानोबा, गणपतराव हे दोन भाऊ आणि राधाबाई ही बहीण अशी यशवंतरावांना तीन भावंडे होती. आई विठाबाई या निरक्षर होत्या पण शिक्षणाचे महत्व जाणत होत्या. [२]

यशवंतराव पदवी परीक्षेपर्यंत शिकले.वकिलीच्या परीक्षेतही यशस्वी होऊन काही काळ वकिली केली . पण स्वातंत्र्य चळवळीत सामील होऊन काँग्रेसच्या राजकारणात सक्रिय होता होता १९४६ साली ते गृह खात्याचे संसदीय सचिव झाले. आणि पुढे द्वैभाषिकाचे व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ; संरक्षण, गृह, अर्थ व परराष्ट्र अशा खात्यांचे मंत्री होत उपपंतप्रधानापर्यंत चढले.[३] त्यांच्या रूपाने महाराष्ट्राला एक विवेकी व सुसंस्कृत नेतृत्व लाभून महाराष्ट्राच्या जीवनावर त्यांनी आपला ठसा कायमचा उमटवला.

**यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक विचार**

'ग्रामीण शिक्षणाची माझी कल्पना' या भाषणात यशवंतराव ग्रामीण शिक्षणासंबंधीची कल्पना मांडतात. पुस्तक वाचून येणारे ज्ञान ते शिक्षण असे समजण्याची एक मोठी प्रथा आहे ती काही अंशी बरोबरही आहे, यशवंतराव शिक्षणाची व्याख्या करताना म्हणतात 'शिक्षित व्यक्तीला स्वतःच्या भोवती घडणाऱ्या गोष्टी जगामध्ये घडणाऱ्या इतर गोष्टी यांची ज्यामुळे काही अंशी संगती लावता येते त्यांचा योग्य अर्थ समजावून घेता येतो आणि त्यांचा परिणाम आपल्या जीवनावर काय घडतो,आपल्या व्यक्तिमत्त्वावर काय घडतो हे समजावून घेता येते आणि समजावून देता येते म्हणजे हे शिक्षण'. अशी शिक्षणाची अतिशय योग्य व्याख्या



Scanned with OKEN Scanner

यशवंतरावांनी केली आहे. पुढे म्हणतात महत्त्वाचे म्हणजे ग्रामीण व शहरी शिक्षण असे शिक्षणाचे दोन प्रकार केले जातात त्यामुळे या ग्रामीण व शहरांमध्ये कृत्रिम अंतर वाढत चालले आहे ते वाढते अंतर कमी करून त्यांच्यामध्ये एक प्रकारचा तोल निर्माण करणे जवळचा संबंध निर्माण करणे हे देशाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे. मुळात यशवंतराव फक्त विचार मांडत नाहीत तर हे अंतर कमी करण्याचे मार्ग देखील सांगतात. त्यांच्या मते गावांची जी आर्थिक रचना आहे त्यात मूलभूत फरक झाला पाहिजे गावातील छोट्या छोट्या धंद्यांना गतिमानता मिळाले पाहिजे आणि शेतीसंबंधी जे नवनवीन संशोधन होत आहे त्याचा उपयोग शेतीसाठी झाला पाहिजे तशा दृष्टीने शिक्षण दिले गेले पाहिजे.

मराठवाडा विद्यापीठाच्या पदवीदान समारंभामध्ये अभिभाषण देताना यशवंतराव नव पदवीधरांकडून काही अपेक्षा व्यक्त करतात एक म्हणजे ज्या प्रदेशात व ज्या काळात आपण राहत आहोत त्याच्या संदर्भात वस्तू स्थितीचा व घटनांचा अभ्यास करणे हे कर्तव्य आहे, दुसरे त्या घटनांना योग्य प्रकारे वळण लागेल अशाप्रकारे प्रयत्नही करावेत दुसरे महत्त्वाचे म्हणजे मराठी भाषेचा विकास हा महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीचा एक स्वाभाविक परिपाक होय. शिक्षणाचे माध्यम व राज्यभाषेचा दर्जा तिला प्राप्त होत आहे. मराठीचे माहेरघर असलेल्या मराठवाड्यात मराठी भाषेच्या विकासास विशेष चालना मिळेल परंतु ते विद्यार्थ्यांना म्हणतात मराठीच्या अभ्यासाबरोबर राष्ट्रभाषा म्हणून हिंदी, सर्व भाषांची मायभाषा व आपल्या प्राचीन संस्कृतीची भाषा म्हणून संस्कृत व आंतरराष्ट्रीय व्यवहाराची भाषा म्हणून इंग्रजी या भाषांचाही अभ्यास करणे आवश्यक आहे.

माध्यमिक शिक्षण मंडळाचे उद्घाटन प्रसंगी बोलताना यशवंतराव म्हणतात शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या तज्ञअशा अधिकारी सेवकांचे एक पार्लमेंट एक संसद असावे,कारण संसदेप्रमाणेच या मंडळावर काम करणाऱ्या तज्ञामध्ये आपल्या विचारांची आपल्या अनुभवांची देवाण-घेवाण होईल प्रसंगी तत्वांचे व विचारांचे संघर्ष ही होतील, परंतु या विचारांच्या मंथनातून आणि संघर्षातून शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या मंडळींना मार्गदर्शक अशी तत्त्वे तयार होतील निर्णय घेतले जातील आणि शिक्षणाचे हे काम उत्तम प्रकारे वाढत राहील या अपेक्षेने मी आपल्या मंडळाकडे पाहत आहे. शिक्षण विषयक प्रश्न बदलत राहतात,आहेत त्या प्रश्नांचे महत्त्व कमी-जास्त होते हे अगदी स्वाभाविक आहे. शिक्षण हा विषयच सर्व स्पर्शी विषय आहे .समाजाच्या आर्थिक. सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील अनेकविध जिव्हाळ्याच्या प्रश्नांची निगडित असलेला असा हा विषय असल्यामुळे त्या क्षेत्रातले प्रश्न आणि त्यांचे प्राधान्य ही जसजशी बदलतील; तसतशी या प्रश्नावरील मतेही बदलत जाणार. हे अगदी उघड आहे तेव्हा या बदलत्या मतांचा मागोवा घेणे या मंडळाचे काम असले पाहिजे. यशवंतरावांच्या मते मंडळाची निर्मिती हे महाराष्ट्र राज्यातील एकात्मतेच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल आहे. एकाच पद्धतीने शिकणारी लक्षावधी मुले एका विशिष्ट वातावरणात वाढू लागली की कळत व नकळत त्यांच्यामध्ये एक प्रकारचा बंधुभाव तयार होईल, एक प्रकारची एकात्मता तयार होईल. महाराष्ट्राला अशाप्रकारे एकत्र बांधून ठेवणारी ही एकात्मता फार महत्त्वाची आहे.

यशवंतरावांच्या मते नोकरीचाकरी मिळवण्यासाठी केवळ शिक्षण पुरे झाल्याचे प्रमाणपत्र पुरेसे नाही तर विद्यार्थ्यांना उपयोगी पडतील अशा कोणत्या गोष्टी करता येणे शक्य आहे याचा विचार केला पाहिजे. त्यामुळे माध्यमिक शिक्षणात विविधता आली पाहिजे त्याचबरोबर उच्च शिक्षणाची संधी देखील सर्वांना मिळाली पाहिजे. जीवनामध्ये स्वतःला मदत करण्याचे सामर्थ्य आपण विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करतो आहोत किंवा नाही हेही पाहिले पाहिजे. माध्यमिक शिक्षणाच्या बाबतीत अशा अनेक गोष्टीचा विचार



Scanned with OKEN Scanner

करण्याची गरज निर्माण झाली आहे. महाराष्ट्राच्या भावी पिढीच्या संपूर्ण संस्कृतिक जीवनाची जबाबदारी या मंडळावर आहे त्याचबरोबर लोक जीवनामध्ये सामर्थ्य निर्माण करण्याचे कार्य माध्यमिक शिक्षण मंडळावर आहे.[५]

शिवाजी विद्यापीठात ०१ डिसेंबर १९७४ रोजी दीक्षांत समारंभात मांडलेले त्यांचे विचार पुढील प्रमाणे आहेत. जीवनाच्या शाश्वत मूल्यांना उजाळा देणार हे वर्ष आहे असे असतानाही सभोवताली दलित समाजावर अन्याय होत असताना दिसतात. अशा घटनांमुळेच आपली सामाजिक आणि नैतिक मूल्य धोक्यात येत आहेत. प्रत्यक्ष कृतीत गुंतलेल्या कार्यकर्त्याला योग्य ते मार्गदर्शन व्हावे अशी अपेक्षा विद्यापीठाकडून आहे परंतु भारतातील विद्यापीठांचा व सर्वच शिक्षण संस्थांचा विचार करताना सर्वत्र निराशेचा सूर दिसून येतो. शिक्षणाविषयीची निराशाही भविष्याविषयाची निराशा होय असे त्यांचे मत आहे. शिक्षण कार्य हे केवळ नैतिक कार्य आहे असे नाही कोणत्याही सामाजिक कार्यास नैतिकतेचे अधिष्ठान लागते म्हणजे शिक्षण कार्य हे चरित्र घडवण्याचे कार्य आहे. आणि समाज जीवनाचे सारेच प्रश्न अधिकाधिक कठीण होत जात आहे ते दूर करण्याचे व्यवहार्य मार्ग म्हणजे त्यासाठी आजच्या परिस्थितीचे काळजीपूर्वक विश्लेषण होणे आवश्यक आहे व हे कार्य यशवंतरावांच्या मते शिक्षणशास्त्रज्ञांचे, शिक्षकांचे, विचारवंतांचे आहे. त्यांनी फक्त परिस्थितीचे विश्लेषण न करता सुधारणा करण्याचा मार्ग दाखवून ते प्रत्यक्ष कार्यवाहीत आणण्याची पद्धती स्पष्ट केली पाहिजे. शिक्षणक्षेत्राच्या स्वायत्ततेबद्दल यशवंतराव म्हणतात उच्च शिक्षण क्षेत्रातील स्वायत्तता ही उच्च शिक्षणाबाबत योग्य आहे. लोकशाही म्हणजे केवळ बहुमताने निर्णय घेण्याची पद्धती असे न मानता ती जीवननिष्ठा बनावी लागेल, तरच तिचा पाया भक्कम होईल. जात, गोत, धर्म, भाषा, प्रदेश, प्रतिष्ठा,पैसा यापेक्षा व्यक्तीचे व्यक्ती म्हणून प्राधान्य मान्य केले तर लोकशाही ही जीवन निष्ठा होऊ शकत नाही अशा समाज रचनेचे स्वप्न साकार होण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे. शिक्षणाच्या दर्जाचा विचार करताना परंपरागत चौकटीतून बाहेर पडले पाहिजे. शिक्षकांच्या कर्तव्याबद्दल आपले विचार मांडताना ते म्हणतात शिक्षकांनी प्रतिष्ठेची खोटी कल्पना बाळगू नये, महागाई, पगार, नोकरीचे स्थैर्य इत्यादी प्रश्नाबरोबर त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष दिले पाहिजे.[६]

**यशवंतरावांचे शैक्षणिक कार्य**

यशवंतराव विद्यार्थी असतानाच त्यांनी दलित समाजासाठी शैक्षणिक कार्य केलेले दिसून येते. विद्यार्थी दशेपासूनच यशवंतराव स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय होते छत्रपती शाहू महाराज,महात्मा फुले,सयाजी महाराज यांच्याबरोबरच महात्मा गांधींच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता. ते महात्मा गांधीजींचे अनुयायी होते, त्यामुळे दलित वर्गाला आपल्या सोबत घेण्यासाठी हरिजन सेवा म्हणता येईल अशा तऱ्हेचे काम करण्याचे ठरवले. महर्षी वी.रा शिंदे यांच्या मदतीने कराड येथे प्रौढ शिक्षण वर्ग चालवले. दररोज संध्याकाळी कराड मधील महार वस्तीत शाळा चालवण्यासाठी जात.७ परंतु या त्यांच्या शैक्षणिक कार्याला जास्त सहकार्य नाही मिळाले कारण डॉ. आंबेडकर हे त्यांचे नेते होते, त्यांनी शिक्षण घेऊन स्वतःची माणुसकी व स्वाभिमान जागवण्याचा संदेश दिला आहे. राजकारणात संघटित होऊन आपण आपली प्रगती आपणच करायची असे आम्ही ठरवले आहे.[८] अशा पद्धतीने महार समाजातील व्यक्ती यशवंतराव व त्यांच्या सहकाऱ्यांसोबत आपले विचार प्रकट करीत.

यशवंतराव मुख्यमंत्री झाल्यानंतर मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाबरोबरच मूलोद्योगी शिक्षणाची ही प्रगती करण्यात आली. माध्यमिक व उच्च शिक्षण, तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण, शारीरिक शिक्षण आणि ललित कलांचे शिक्षण यामध्ये सुधारणा घडवून आणल्या.[९] मोफत शिक्षणाची योजना महाराष्ट्रात प्रथमच सुरू करण्यात आली. भारतीय घटनेच्या ४६ व्या कलमानुसार राज्य सरकारने लोकांच्या विशेषतः मागासलेल्या लोकांच्या शैक्षणिक व आर्थिक हिताकडे खास लक्ष पुरवण्याची तरतूद करण्यात आली.



Scanned with OKEN Scanner

मार्गदर्शक तत्व अमलात आणण्यासाठी सरकारने जात आधारभूत न मानता आर्थिक मिळकत आधारभूत मानण्याचे ठरवलं. त्यानुसार ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न ९०० रुपयांपेक्षा जास्त नसेल अशा गरीब विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्यासंबंधीचे नियम प्रथमच तयार करण्यात आला.[१०] या सवलतीचा लाभ अर्थातच समाजातल्या बहुसंख्य वर्गाला झाला.

बाळासाहेब खेर यांच्या कारकिर्दीत महाराष्ट्रात इंग्रजी विषयाच्या शिक्षणाला पायबंध घातला होता. यशवंतरावांनी बाळासाहेबांचा जो जुना निर्णय बदलून टाकला आणि शाळातून इंग्रजी विषय शिकवण्याबाबत सरकारचा नवा निर्णय जारी केला. इंग्रजी हा ऐच्छिक विषय म्हणून पाचव्या इयत्तेपासून शिकवण्यात यावा असा निर्णय घेतला. इयत्ता पाचवी ते सातवी पर्यंत ऐच्छिक विषयाच्या आधारावर इंग्रजी शिक्षण देण्याच्या संदर्भात सरकारचा निर्णय अमलात आणण्याच्या दृष्टीने त्यांनी एक समिती ही नियुक्ती केली. राज्यात नव्याने सामील झालेल्या मराठवाडा विभागात शिक्षण प्रसार करण्याचा प्रश्न होता. त्यानुसार तेथे शिक्षण प्रसार व्हावा आणि दुय्यम शिक्षण देणाऱ्या खाजगी संस्था पुढे याव्यात यासाठी योजना तयार करण्यात आली. ज्या संस्था आठवीपासून पुढील वर्ग सुरू करतील त्यांना या दृष्टीने सढळ मदत देण्याचं सरकारने ठरवलं. ग्रामीण भागात अशा संस्थांना मात्र पहिल्या वर्षी एकूण खर्चाच्या ९०टक्के, दुसऱ्या वर्षी ८० टक्के , तिसऱ्या वर्षी ७० टक्के, चौथ्या वर्षी ६० टक्के आणि पाचव्या वर्षी ५० टक्के असं अनुदान या निर्णयामुळे देण्याची तरतूद झाली.

मराठवाडा विभागाकरता वेगळे विद्यापीठ स्थापन करण्याच्या प्रश्नालाही याचवेळी चालना देण्यात आली. जस्टीस एस. एम पळनीटकर यांच्या अध्यक्षतेखाली त्यासाठी नऊ सदस्यांची एक समिती नियुक्त करण्यात आली. या समितीने पुढे डिसेंबर १९५७ मध्ये आपला अहवाल सरकारला सादर केला आणि मराठवाड्यासाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याची शिफारस केली. मराठवाड्यातील महाविद्यालय उस्मानिया विद्यापीठाशी जोडण्यात आली होती ,त्यांची मुदत आता संपत आली होती. त्यामुळे १९५८ च्या जून पासून म्हणजे नव्या शैक्षणिक वर्षापासून मराठवाडा विद्यापीठाची स्थापना करावी अशा या समितीची आग्रहाची सूचना होती. मराठवाडा विद्यापीठ त्यानुसार प्रत्यक्षात स्थापन झालं आणि २३ ऑगस्ट १९५८ ला पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते नव्या विद्यापीठाचे उद्घाटन करण्यात आलं. मराठवाड्याप्रमाणेच दक्षिण महाराष्ट्रासाठी कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठ स्थापन करण्याचा विचारही यशवंतरावांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकिर्दीतच केला गेला आणि योजनेमध्ये त्यासाठी ५० लाखांची तरतूद करण्यात आली. राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांनी विद्यापीठाचे उद्घाटन केलं. त्याचबरोबर सातारा येथील सैनिक स्कूल ची स्थापना हे सैनिक शिक्षण क्षेत्रातील यशवंतरावांचं असंच एक महत्त्वाचं कार्य आहे. नॅशनल डिफेन्स अकादमीसाठी शिक्षण मिळण्याची सोय साताऱ्याच्या या सैनिक स्कूलमुळे उपलब्ध झाली. भारतातलं अशा प्रकारचं हे पहिलं सैनिकी स्कूल ठरलं. या स्कूल मधल्या एकूण विद्यार्थ्यांमध्ये दहा टक्के जागा महाराष्ट्रातल्या माजी सैनिकांच्या मुलांकरता राखून ठेवण्याची तरतूद आहे. त्या वेळेचे संरक्षण मंत्री कृष्णमेनन यांच्यात हस्ते यशवंतरावांनी या स्कूलचं दिनांक २३ जून १९६१ ला उद्घाटन केलं. शिक्षणाच्या या सोयी करत असताना वर्गीकृत जनजाती मधल्या मुलांनाही शिक्षण मिळाले पाहिजे असा कटाक्ष ठेवण्यात आला. आदिवासींच्या मुलांच्या शिक्षणाबाबत असाच एक व्यवहारी निर्णय त्या काळात करण्यात आला. आदिवासी मुलांना शिक्षण द्यायचं तर त्यांना आपल्या मुलांना शाळेत आणावं लागणार होतं परंतु या प्रश्नात बरीच गुंतागुंत होते त्यासाठी असा निर्णय करण्यात आला की आदिवासी मुलांना शाळेत आणण्याऐवजी त्यांच्या दारीच शैक्षणिक सोयी नेऊन पोचवाव्या. त्यातूनच मग आश्रम शाळांची योजना साकार झाली.[१२] शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र क्रांती घडवून आणणारे अनेक निर्णय यशवंतरावांच्या नेतृत्वाखाली सरकारने त्यावेळी केले. औरंगाबाद आणि कराड

येथे दोन नवी इंजिनिअरिंग कॉलेज सुरू करण्याचा निर्णय तेव्हाच करण्यात आला, तसेच नागपूरच्या सरकारी इंजिनिअरिंग कॉलेज भारत सरकार पुरस्कृत करण्यात येणाऱ्या इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये रूपांतर करण्यात आलं.'[१३]

प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा ,महाविद्यालय विद्यापीठ आदी शैक्षणिक सोयींनी महाराष्ट्र जो पुढारलेला आढळतो त्याचं मूळ त्या चार-पाच वर्षांच्या कारकिर्दीत चव्हाण सरकारने केलेल्या निर्णयात सापडतं.

**समारोप**

महाराष्ट्र मोठा व्हावा, पण देश मोठा झाला तर महाराष्ट्र मोठा होईल ही यशवंतरावांची भूमिका विशेष महत्त्वाची आहे. यशवंतरावांचे व्यक्तित्व विवेकी तर कर्तृत्व विधायक होते. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर अनेक लोकोपयोगी उपक्रम राबवले. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद (नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे नामांतर झालेले) असे दोन विद्यापीठ स्थापून महाराष्ट्राच्या शैक्षणिक प्रगतीत मोलाचे योगदान दिले. राजकीय ,सामाजिक ,शैक्षणिक ,आर्थिक अशा विविध क्षेत्रात त्यांच्या कार्याचा ठसा दिसून येतो. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार असा जो त्यांचा गौरवाने उल्लेख केला जातो तो अतिशय योग्यच आहे.

**संदर्भ**


१. १.तळवलकर गोविंद, यशवंतराव चव्हाण व्यक्तित्व व कर्तुत्व, मौज प्रकाशन ग्रह, पहिली आवृत्ती २२एप्रिल २०१३, पृ.क्र. १

२. कित्ता ,पृ.क्र. १

३. कित्ता,पृ. क्र. ३

४. चव्हाण यशवंतराव, सह्याद्रीचे वारे, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान., मुंबई. पहिली आवृत्ती २६ जानेवारी १९६२.. पृ. क्र. १२२ ते १२९

५. चव्हाण यशवंतराव, युगांतर, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे., पहिली आवृत्ती ७मे १९७० पृ. क्र १६३ ते १६८

६. चव्हाण यशवंतराव, भूमिका, प्रेस्टीज पब्लिकेशन्स,पुणे., पहिली आवृत्ती १५ डिसेंबर १९७९. पृ. क्र. १६१ ते १६९

७. चव्हाण यशवंतराव, यशवंतराव चव्हाण आत्मचरित्र कृष्णाकाठ खंड पहिला, प्रेस्टीज प्रकाशन., पहिली आवृत्ती ७ फेब्रुवारी १९८४., पृ. क्र. 144

८. कित्ता, पृ. क्र. १४५

९. जोशी रामभाऊ, यशवंतराव: इतिहासाचे एक पान, केसरी प्रकाशन पुणे., पहिली आवृत्ती १९७६, पृ. क्र. २५२

१०. कित्ता ,पृ. क्र. २५३

११. कित्ता ,पृ. क्र. २५४

१२. कित्ता ,पृ. क्र. २५५

१३. कित्ता, पृ क्र.२५५,२५६




Scanned with OKEN Scanner